**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिगंबर डी.भोसले
सर्व्हे नं.३०/अ/२/१ व स.नं.३१/१/२,
दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था, धनकवडी, पुणे ४११०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय, क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४७ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिगंबर डी.भोसले
सर्व्हे नं.३०/अ/२/१ व स.नं.३१/१/२,
दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था, धनकवडी, पुणे ४११०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय, क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.मकरंद कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दौलतनगर को-ऑप.हौ.सोसायटी स.नं.३०, हिस्सा नं.२/१ ब, स.नं.३२, हिस्सा नं.२/१ धनकवडी येथील रस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडील मंजूर ले-आऊट प्लानप्रमाणे आहेत का? जर ले-आऊट प्लानमध्ये दुरुस्ती असेल तर दुरुस्त प्लान महानगरपालिकेकडे आहे का? या रस्त्यावर सोसायटीच्या सभासदांनी अतिक्रमण केले आहे का? असल्यास त्यांना नोटिसा दिल्या आहेत का? | |

## विवेचन

दौलतनगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीमधील रस्त्याबाबतची माहिती मागणाऱ्या अर्जाला जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी उत्तर दिले नाही. समक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी व उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका यांनी विहित मुदतीत अपिलाची दखल घेतली गेली नाही या कारणावरुन अपीलकर्ता श्री.दिगंबर डी.भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.भोसले यांनी दि.४.६.२००७ रोजी माहिती मिळण्याबाबत नगर अभियंता कार्यालयाकडे अर्ज केला. त्यांनी तो दि.१४.६.२००७ रोजी सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग यांच्याकडे पाठविला. त्यांना तो दि.१७.७.२००७ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने उपायुक्त क्र.४ यांच्याकडील सहाय्यक अभियंता यांनी अर्जातील तीन मुद्दयांची माहिती तयार करुन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्याकडे दि.१.८.२००७ रोजी पाठविली. दरम्यान श्री.भोसले यांनी दि.२०.७.२००७ रोजी उपायुक्त, विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील दाखल केले. 'अर्जातील बाबी या ले-आऊटच्या व बांधकाम नियंत्रण कार्यालयाशी संबंधित असल्याने क्षेत्रिय

कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नसल्याने पुढील कार्यवाहीसाठी दि.३.८.२००७ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका यांच्याकडे पाठविला. दि.२८.९.२००७ व दि.५.१०.२००७ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता यांनी सुनावणी घेतली. धनकवडी येथील संबंधित मिळकतीत समक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी व श्री.भोसले यांच्याशी चर्चा करुन विकास विभागाकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांना त्वरित द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला,' असे अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता यांनी दि.१५.११.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. संबंधित अर्जाबाबतची माहिती विकास योजना कार्यालयाने कळविणे अपेक्षित होते, असे जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका श्री.अनिरुध्द पावसकर यांनी आयोगाने केलेल्या विचारणेनंतर दि.७.११.२००७ रोजी श्री.भोसले यांना कळविले. दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था येथील ले-आऊट जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्य झालेला असल्याने त्याची मूळ प्रत / प्रमाणित प्रत व प्रकरण पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. तसेच कलेक्टर मान्य ले-आऊट व पुणे महानगरपालिकेच्या ड्राफ्ट डीपीमधील नियोजित रस्त्याची रुंदी १८ मीटर, आहे असे श्री.भोसले यांना दि.१०.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दि.१५.११.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर श्री.भोसले यांच्याशी चर्चा करुन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका यांच्या दि.७.११.२००७ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती त्यांना कळविण्यात आली आहे, असेही या पत्रात श्री.अनिरुध्द पावसकर यांनी म्हटले आहे.

सन १९८० मध्ये विकास आराखडा मंजूर झाला आहे. त्यातील रस्ता सरळ असणे आवश्यक आहे. मात्र अतिक्रमणे वाचविण्यासाठी मूळ मंजूर आराखड्यातील रस्ता-रेषेत बदल करुन आपल्या भूखंडामधील काही भाग रस्त्यात घेण्याचा प्रयत्न महानगरपालिका करीत आहे,

अशी श्री.भोसले यांची तक्रार असून गेली काही वर्षांपासून विविध मार्गांनी ते हा विषय सातत्याने मांडत आहेत. अतिक्रमण काढणे अथवा रस्ता सरळ आखणे याबाबतच्या मागण्या हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही, मात्र संबंधित लेआऊटची प्रत महानगरपालिकेकडे उपलब्ध नसली तर रस्त्याची आखणी महानगरपालिका कशाच्या आधारे करीत आहे, हा अपीलकर्त्यांचा प्रश्न रास्त आहे व त्याचे स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे.

'जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या ले-आऊटमध्ये दर्शविल्यानुसार दौलतनगर सोसायटीमधील रस्ता १८ मीटर रुंदीचा आहे. तसेच पुणे महानगरपालिकेने मान्यतेसाठी सादर केलेल्या विकास आराखड्यात दर्शविलेला सदर डी.पी.रस्ता हादेखील १८ मीटर रुंदीचा आहे व तो जिल्हाधिकारी यांच्या मंजूर लेआऊटनुसार दर्शविला आहे. पुणे महानगरपालिकेकडून विकास आराखडा तयार करुन तो राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. अद्याप त्यास मंजुरी मिळालेली नाही. तथापि, महाराष्ट्र शासन यांनी विकास आराखड्यातील डी.पी.रस्त्यांना दि.१.७.२००८ रोजी मंजुरी दिलेली आहे. परंतु शासनाकडून स्वाक्षांकित नकाशे पुणे महानगरपालिकेस अद्याप प्राप्त झालेले नाहीत. या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेकडून शासनाकडे नकाशे स्वाक्षांकित करुन मिळण्यासाठी पाठविण्यात आलेले आहेत,' असे आयोगाच्या तोंडी आदेशानंतर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, विकास योजना क्र.२, पुणे महानगरपालिका श्री.मकरंद कुलकर्णी यांनी दि.१४.८.२००८ च्या पत्रान्वये श्री.भोसले यांना कळविले. या पत्रातही मूळ अर्जातील पाच मुद्दे बांधकाम नियंत्रण विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागाशी संपर्क साधण्यास कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण उपविभाग यांनी पूर्वी दिलेली माहितीच दि.१८.८.२००८ च्या पत्रान्वये श्री.भोसले यांना पुन्हा कळविली.

श्री.भोसले यांचा मूळ अर्ज दि.४.६.२००७ चा होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याला उत्तर दिलेले नाही. मात्र दि.१४.६.२००७ राजी त्यांनी हा अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण यांच्याकडे पाठविला. त्यांना तो दि.१७.७.२००७ रोजी म्हणजे ३३ दिवसांनी मिळाला.

महानगरपालिकेच्या एका खात्यातून दुसऱ्या खात्यात अर्ज पोहोचण्यास एवढा अवधी लागावा हे आश्चर्यकारक व अयोग्य आहे. प्रथम अपिलाचीही विहित मुदतीत दखल घेतलेली नाही. बांधकाम नियंत्रण विभाग व विकास योजना कार्यालय हे माहितीची जबाबदारी परस्परांवर ढकलत असल्याचेही संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरातून व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रातून दिसून येते. माहिती देण्यापेक्षा टोलवाटोलवी अधिक असल्याचे हे निदर्शक आहे. प्रथम अपिलाचीही विहित मुदतीत दखल घेतलेली नाही. दि.१०.१०.२००७ रोजी माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता यांनी म्हटले असले तरी संबंधित आराखड्याची प्रत उपलब्ध नसल्याचे व रस्त्याची रुंदी १८ मीटर दर्शविली असल्याचे त्यात कळविले आहे. एकुणात अपीलकर्त्याला विलंबाने माहिती देण्यात आली आहे. एवढा विलंब होण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभागातील संबंधित जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतात.

अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी विहित मुदतीत अपिलाची दखल घेतली नाही, तसेच माहितीबाबतचा विषय गांभीर्याने हाताळला नाही, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. याबद्दल तीव्र नापसंती नोंदवून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.शांताराम थोरात यांना समज देण्यात येत आहे.

दि.४.६.२००७ रोजी प्राप्त झालेला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसात अन्य संबंधित विभागाकडे पाठविणे आवश्यक व शक्य होते, परंतु सहाय्यक अभियंता, विकास योजना क्र.२ यांनी तो दहा दिवसांनी पाठविला. श्री.भोसले यांनी दि.२०.७.२००७ रोजी उपायुक्त क्र.४, टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय येथे अर्ज दाखल केलेला आहे. त्या मुद्दयाची माहिती मिळाली नाही म्हणून अपील केलेले होते, तो मुख्य महानगरपालिका भवन विभागाशी संबंधित असल्याने अपील मुख्य महानगरपालिका भवन विभागाकडे क्षेत्रिय कार्यालयाने दि.१३.९.२००७ रोजी म्हणजे अपील प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसांनी पाठविले. यावरुन माहितीच्या

अधिकारातील अर्जांच्या हाताळणीबाबत महानगरपालिका यंत्रणेत तत्परता व पुरेसे गांभीर्य नसल्याचे स्पष्ट होते.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जबाबदार असणाऱ्यांची नावे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मकरंद कुलकर्णी यांनी, तसेच संबंधित रस्त्याबाबतची सद्यस्थितीची माहिती अपीलकर्त्यास तीन दिवसात द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीचया वेळी दिला होता. त्यानुसार तीन दिवसात माहिती देण्यात आली. मात्र मुळात माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा कोणताही अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केलेला नाही.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) (१)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मकरंद कुलकर्णी यांना मूळ अर्जाच्या तारखेपासून तीन दिवस वजा जाता दि.१.८.२००७ पर्यंत (२५०X२८)रु.६८००/- व (२)मूळ अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसांत पाठविला नाही, ३३ दिवसांनी तो अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग यांच्याकडे दि.१७.७.२००७ रोजी पोहोचला. त्यांनी दि.१.८.२००७ रोजी माहिती दिली. झालेल्या विलंबाला नगरअभियंता कार्यालयातील कर्मचारी जबाबदार आहेत व ते शासतीस पात्र ठरतात. अशा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांना विहित मुदतीचे ३० दिवस वजा जाता २८ दिवसांच्या विलंबाबद्दल (२५०x२८=९०००) रु.९०००/- शास्ती लावावी. याबाबत चौकशी करुन व शास्ती वसूल करुन नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला अहवाल सादर करावा.

(३) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मदन आढारी यांनी मूळ अर्जापासून दि.१०.१०.२००७ पर्यंत म्हणजे ३० दिवसांची विहित मुदत वजा जाता ९६ दिवसांच्या विलंबाबद्दल (२५०X९६)रु.२४०००/- इतकी शास्ती करण्यात येत आहे.

(४) शास्तीची रक्कम संबंधितांच्या जून २००९ च्या जुलै २००९ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन दि.१५.७.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी करावी. तसेच याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.११.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. प्रकाश किसन काळोखे
मु.पो.देहूगाव, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, (पंचायत),
पंचायत समिती, हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, देहूगाव (विठ्ठलवाडी), ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३१ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.०३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रकाश किसन काळोखे
मु.पो.देहूगाव, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, देहूगाव (विठ्ठलवाडी), ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.०८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.०८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.०८.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>स्वच्छतागृह पाडण्याबाबत दि.२३.०२.२००७ ते आज अखेरची कार्यवाही, स.नं.११/२ब मध्ये संमतीपत्रे आहेत का, ग्रामपंचायत मासिक सभेत बांधकाम ठराव झाला आहे का, शासकीय कोणत्या फंडातून काम झाले आहे, स्वच्छतागृह ५.१०, २०.६ व ०३.११.२००६ काय कार्यवाही केली, १९.०७.२००६ चे पत्र शेतजमिनीवर विनापरवाना व अतिक्रमाणाबाबत काय कार्यवाही केली. दि.२५.०७.२००६ अतिक्रमणाबाबत काय कार्यवाही केली, दि.१०.१०.२००६ चे बांधकाम परवाना ठरावाची माहिती व नक्कल, स्वच्छतागृहाची माहिती १९९४-९५, परवाना माहिती २००६ |

## सुधारित आदेश

**वाचा :-** आयोगाचे समक्रमांकाचे आदेश दि.३०.०३.२००९

## विवेचन

विषयाधीन प्रकरणी आयोगाने दि.३०.०३.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये (परिच्छेद क्र.४) अन्वये विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, हवेली श्री.बी.टी.पवार यांना मूळ माहिती नाकारण्यात सहभागी असल्याबद्दल शास्ती रु.५,०००/- लावण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने श्री.एन.पी.पावडे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत देहू यांनी दि.१७.०४.२००९ रोजीचे पत्रान्वये आयोगास सादर केलेल्या निवेदनामध्यें, 'श्री.प्रकाश किसन काळोखे यांनी विचारलेली माहिती देणेबाबत अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) श्री.बी.टी.पवार यांनी मला वारंवार फोनवरुन सांगितले होते. तसेच त्यांनी लेखी पत्राद्वारे देखील कळविले होते. श्री.बी.टी.पवार अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) यांना सदरची माहिती अर्जदार श्री.काळोखे यांना दिल्याचे सांगितले होते. याला सर्वस्वी मी जबाबदार असून माहिती अधिकारी म्हणून माहिती देणेची जबाबदारी माझी होती. तरी त्यांचेवर (श्री.पवार) लावणेत आलेल्या शास्तीचा फेरविचार करणेबाबत विनंती आहे'

तसेच श्री.बी.टी.पवार, अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, हवेली, पुणे यांनी दि.१८.०४.२००९ चे पत्रान्वये आयोगास सादर केलेल्या निवेदनामध्ये, श्री.काळोखे यांना माहिती देणेबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री.पावडे यांना दि.२७.०९.२००७ चे कार्यालयीन पत्रान्वये लेखी कळविण्यात आले होते. तद्नंतर निवडणूकीच्या कामामुळे कार्यालयात सातत्याने उपस्थित नसतानाही श्री.काळोखे यांना माहिती देणेबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पावडे यांना वारंवार तोंडी तसेच दूरध्वनीद्वारे कळविले होते तसेच दि.२१.१०.२००८ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत

कार्यक्रमा' च्या वेळी अर्जदार उपस्थित नसल्याने श्री.पावडे यांचेकडे श्री.काळोखे यांना माहिती दिली का ? अशी विचारणा केली असता श्री.पावडे यांनी श्री.काळोखे यांना माहिती दिलेली आहे असे ठाममपणे उपस्थित अधिकारी व माझे समक्ष तोंडी सांगितले त्यानुसार 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' चे प्रपत्रामध्ये अपील निकाली काढणेत यावे असे लिहिलेले आहे व श्री.काळोखे उपस्थित नसल्याने त्याबाबत खातरजमा करता आली नाही. अपील निकाली काढणेबाबत शिफारस करणेमागे माझा कोणताही वाईट हेतू वा उद्देश नव्हता तसेच आयोगाची दिशाभूल करण्याचाही कसल्याही प्रकारचा हेतू नव्हता.

दि.१२.०३.२००९ रोजीचे सुनावणीच्या वेळी निवडणूक कामकाजामुळे सुनावणीस मी उपस्थित राहू शकलो नाही व याबाबतचे पत्र देणेसाठी कार्यालयातील कर्मचारी श्री.विष्णू लोखंडे यांना पाठविण्यात आलेले होते. श्री.लोखंडे यांना माझा प्रतिनिधी म्हणून पाठविणेत आलेले नव्हते. असे नमूद करुन श्री.काळोखे यांना माहिती उपलब्ध न झालेबाबत सर्वस्वी श्री.पावडे जबाबदार असल्याने त्यांचेवर लावणेत आलेली शास्ती रद्द करण्याची विनंती श्री.पवार यांनी केलेली आहे. उपरोक्त दोन्ही निवेदनांचा साकल्याने विचार करुन पुढीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) श्री.बी.टी.पवार यांना दि.३०.०३.२००९ रोजीचे आदेशान्वये लावण्यात आलेली शास्ती रु.५,०००/- रद्द करण्यात येत आहे. त्यानुसार दि.३०.०३.२००९ रोजीचे आदेशामधील परिच्छेद क्रमांक ४ रद्द करण्यात येत आहे.

२) श्री.बी.टी.पवार यांना अपीलकर्ता श्री.काळोखे विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये उपस्थित नसल्याने माहितीबाबत खातरजमा करता आली नाही, हा खुलासा योग्य नाही. श्री.काळोखे यांना देण्यात आलेल्या माहितीची प्रत व पोच यांची मागणी श्री.पावडे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक होते. तोंडी खुलाश्यावरुन अपिलाबाबत शिफारस करणे म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे गांभीर्य नसल्याचे स्पष्ट होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची

अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी बरोबरच प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांची देखील आहे. यापुढे उक्त अधिनियमान्वये प्राप्त अर्ज / अपीले इत्यादीबाबत काळजीपूर्वक कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याची समज श्री.बी.टी.पवार यांना देण्यात येत आहे व याची नोंद श्री. पवार यांचे सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती हवेली, पुणे यांची राहील.

३) श्री.विष्णु लोखंडे यांना दि.१२.०३.२००९ चे सुनावणीमध्ये अपिलीय प्राधिकाऱ्याचे प्रतिनिधी म्हणून प्राधिकृत केलेले नसतानाही अपिलीय प्राधिकारी म्हणून सुनावणीमध्ये सहभागी होणे, खातरजमा न करुन घेता माहिती देणे या आक्षेपार्ह कृतीबाबत ताकिद देण्यात येत आहे व याची नोंद श्री.लोखंडे यांचे सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती हवेली, पुणे यांची राहील.

पुणे
दि. : ११ -०५-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.किरण प्रेमचंद भंगाळे
३५, आनंदनगर, स्विमिंग टँक समोर, १२/१, सांगवी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
विकास अभियंता(पथ), पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता(प्रकल्प),
सहाय्यक विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५९+९७८+९७९+१३५८+१३६०/पुणे/२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किरण प्रेमचंद भंगाळे
३५, आनंदनगर, स्विमिंग टँक समोर, १२/१, सांगवी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
विकास अभियंता(पथ), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रशांत वाघमारे

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता(प्रकल्प),
सहाय्यक विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.एन.एन.बारापात्रे

| अ.क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९७८ | २३.२.२००७ | ४.५.२००७ | ९.४.२००७ | ३.५.२००७ |
| २ | ९७९ | २.३.२००७ | -- | ९.४.२००७ | ९.४.२००७ |
| ३ | १३५८ | १७.५.२००७ | ४.५.२००७ | १६.७.२००७ | १४.९.२००७ |
| ४ | १३६० | २०.६.२००७ | १४.८.२००७ | १३.८.२००७ | १४.९.२००७ |
| ५ | १३५९ | १७.५.२००७ | १४.८.२००७ | १६.७.२००७ | -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्रमांक-९७८**

सूस रस्ता ते पाषाण-बाणेर शीव या नियोजित ३६ मीटर डी.पी.रोड संदर्भातील टेंडर काढल्यापासून ते किती रकमेला मंजूर झाले, वर्क ऑर्डर किती रकमेची, पैकी किती रक्कम आदा केली. कोणत्या वर्तमानपत्रात याबाबत जाहिरात दिली, कोठलाही रस्ता केवळ मान्य आराखड्यानुसार रस्ता होणारच आहे म्हणून बिल्डर असा रस्ता स्वतःहून आखू शकतो काय, याबाबत नियमावली, तसेच निवासी असेल तर तेथे घरे होणारच म्हणून महानगरपालिका घरे बांधू शकते काय, नियमावली.

**अपील क्रमांक-९७९**

सूस रस्ता ते पाषाण-बाणेर शीव या नियोजित ३६ मीटर डी.पी.रोड संदर्भातील मिळकतीमध्ये कायदेशीररीत्या प्रवेश करुन रस्ता बांधण्यास हरकत नसल्याचे संमतीपत्र दिले त्याची प्रत.

**अपील क्रमांक-१३५८ १३६०**

सूस रस्ता ते पाषाण-बाणेर शीव या नियोजित ३६ मीटर डी.पी.रोड संदर्भातील टेंडर प्रक्रियेपासून काम सुरु, संपले कधी, मुदतवाढ दिली का, कारण, कामाची मापे इ. माहिती

**अपील क्रमांक-१३५९**

लोकशाही दिनात दिलेल्या अर्जावर आयुक्तांनी अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयावरुन काय निर्णय घेण्यात आला, तसेच त्या अनुषंगाने संबंधित खात्यातर्फे काय कार्यवाही करण्यात आली, त्याबाबत केलेला सर्व पत्रव्यवहार.

## विवेचन

सूस रस्ता ते पाषाण-बाणेर शीव या नियोजित ३६ मीटर डी.पी. रस्त्याबाबतची विविध स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री.किरण प्रेमचंद भंगाळे यांनी जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता, (प्रकल्प), सहाय्यक विकास अभियंता, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. परंतु विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, तर अपील क्रमांक ९७९ मध्ये काही माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, विकास अभियंता (पथ), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी अपील क्रमांक ९७८, ९७९ मध्ये निर्णय देऊनही आठ महिने माहिती दिली गेली नाही व अन्य अपिलांमध्ये माहिती देण्याबाबत त्यांनी आदेश दिले, तरीही विलंबाने माहिती मिळाली, या कारणावरुन श्री.भंगाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे पाच अपिले केली आहेत. एकाच विषयातील माहितीसाठी चार अपिले असून याच विषयासंदर्भात लोकशाही दिनात केलेल्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती पाचव्या-अपील क्र.१३५९ मध्ये मागितली होती.

आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही, तसेच दिलेली माहिती विहित मुदतीत मिळाली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशावर त्यांच्याकडेच आपण पुन्हा अपील केले, त्याची गंभीर नोंद घेऊन संबंधितास त्वरित कार्यवाहीचे आदेश देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांनी आपल्याला कळविले. बराच पाठपुरावा केल्यानंतर आपल्याला माहिती विलंबाने देण्यात आली, असे प्रतिपादन श्री.भंगाळे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. श्री.भंगाळे यांच्या अर्जाची व अपिलांची दखल त्या त्या वेळी घेण्यात आली होती. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरील कार्यवाही करण्यात आली होती. विषयातील गुंतागुंत व संबंधित विभागाकडे असलेली पावसाळ्यातील कामे यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प), सहाय्यक विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.एन.एन.बारापात्रे व

अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, विकास अभियंता(पथ), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्र.म.वाघमारे यांनी नमूद केले.

सर्व अपिलांबाबत केलेली कार्यवाही व माहिती देण्यास झालेला विलंब याबाबत चार दिवसात लेखी खुलासा करण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार विकास अभियंता (पथ), पुणे महानगरपालिका यांनी दि.१४.८.२००८ व दि.२२.८.२००८ रोजी खुलासा सादर केला आहे. रस्त्याबाबतच्या श्री.भंगाळे यांच्या तक्रारी लक्षात घेऊन पथ विभागाच्या संबंधित अभियंत्याने श्री.भंगाळे यांना वारंवार बोलावून संबंधित जागेची पाहणी करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती तोंडी स्वरुपात दिली. संबंधित विषय सन २००३ मधील असून आपल्या मिळकतीत अतिक्रमण झाल्याची श्री.भंगाळे यांची मुख्य तक्रार आहे. संबंधित निविदा प्रकरण / फाईल शोधून घेण्यास काही वेळ लागेल, असे त्यांना सांगण्यात आले होते. ती फाइल मिळाल्यानंतर संपूर्ण अभिलेख श्री.भंगाळे यांना दाखविण्यात आला व त्यातील आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना समक्ष देण्यात आल्या, तसेच पुणे शहरातील रस्त्यांची सन २००७-०८ च्या पावसाळयात-अर्थात जून २००७ ते सप्टेंबर २००७ या काळात मोठ्या प्रमाणात दुरुस्तीची कामे करण्यात येत होती. ही बाब दैनंदिन स्वरुपाची नसून सन २००७ च्या पावसाळयात प्रथमच पथ विभागाने २४ तास तक्रार-निवारण कक्ष निर्माण करुन नागरिकांच्या तक्रारी ४८ तासात निरस्त करण्याची यंत्रणा उभी केली होती. ही यंत्रणा उभारण्यासाठी कोणताही जादा सेवकवर्ग प्रशासनातर्फे उपलब्ध केला नसून आहे त्याच सेवकांच्या नियुक्त्या करुन हा कक्ष अत्यंत समाधानकारकरीत्या या काळात कार्यान्वित झाला. तसेच या काळात उच्च न्यायालयात पुणे महानगरपालिकेविरुध्द दाखल झालेल्या जनहित याचिकेची वांरवार सुनावणीच्या तारखा पडत गेल्याने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जरुर ती पूर्तता करण्यात हाच सेवकवर्ग व्यग्र होता. (आता ही जनहित याचिका पुणे महानगरपालिकेचे बाजूने निकाल होऊन निकाली लागलेली आहे.) त्यामुळे पथ विभागाकडील उपलब्ध सर्व स्टाफ रस्त्यांचे देखभाल दुरुस्तीचे कामासाठी नेमण्यात आलेला होता. त्यामुळे श्री.भंगाळे यांची माहिती प्रत्यक्ष लेखी स्वरुपात देण्यात विलंब झालेला आहे.' मात्र त्यांना समक्ष व

तोंडी स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.' असे विकास अभियंता श्री.एन.एन.बारापात्रे यांनी या खुलाशात विस्ताराने नमूद केले आहे. 'दिवसरात्र कामाच्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असलेल्या अभियंता सेवकवर्गाच्या कामकाजाकडे सहिष्णुतेने बघण्यात यावे, ही विनंती असून या विलंबाप्रित्यर्थ दंड आकारण्यात येऊ नये, अशी नम्र विनंती आहे,' हे या खुलाशातील निवेदन मान्य करुन शास्ती लावण्यात आलेली नाही. मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असताना एकाच विषयात अनेक व सातत्याने अर्ज व अपिले करणे ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. मात्र संबंधित अर्जांना उत्तर देण्यास आठ-आठ महिने विलंब लागणे, कामाचा ताण लक्षात घेताही समर्थनीय नाही. अपवादात्मक बाब म्हणून यावेळी ते मान्य करण्यात येत असले, तरी विहित मुदतीत लेखी उत्तर दिले जाणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.माधव रघुनाथ लाटकर व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत मधुकर वाघमारे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा निर्णय पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील** १३७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

ॲड. किरण ए. कदम
८५२, दत्तवाडी, विठ्ठल मंदिरामागे,
पुणे ४११ ०३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे -१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड. किरण ए. कदम
८५२, दत्तवाडी, विठ्ठल मंदिरामागे,
पुणे ४११ ०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे -१ श्री.ए.एच.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे -१ श्री.सी.बी.भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि..३०.०४.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कार्यालयातील कर्मचारी श्री.रमेशकुमार नथुराम ढिंगीया यांची सारस्वत को.ऑप बँक लि.करीता आरबिट्रेडर यांचे निकालाप्रमाणे त्यांची रु.२०,०००/- ची रक्कम कपात करुन ठेवलेली आहे. सदर आरबिट्रडर यांचे निकालाचे विरुध्द श्री.ढिगींया यांनी किरकोळ अर्ज नं.६८३/०६ दाखल केला होता त्यामध्ये निकाल श्री.ढिंगीया (आमचे अशील) यांचे बाजूने लागलेला असतानाही कपात रक्कम रु.२०,०००/- परत न देणेबाबतचा खुलासा व अनुषंगिक मुद्दे. | |

## विवेचन

आपले अशील श्री.ढिंगीया यांच्या पगारातून कपात केलेली रक्कम रु.२०,०००/- प्रस्तुत प्रकरणीच्या सुनावणीमध्ये देण्यात आलेल्या निदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सहायक नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांनी त्यांचे दि.०३.०२.२००९ चे पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार 'श्री.ढिंगीया यांचे वेतनामधून कपात / वसूल केलेली रक्कम अदा / परत करणेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. सदर बाब प्रशासकीय स्वरुपाची असून प्रकरणाची क्लिष्टता वाढलेली असल्याने अंतिम निर्णय होईपर्यंत रक्कम अदा करणेबाबत मत व्यक्त करता येत नाही,' असे अहवालत नमूद केले आहे. सदरहू वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता ॲड.कदम यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत खुलासा, स्पष्टीकरण मागण्याची तरतूद नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. : ११ -०५-२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुसूदन प.लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य उद्यान अधीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वृक्ष अधिकारी,
संभाजी उद्यान, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९७+१५९४ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुसूदन प.लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य उद्यान अधीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.यशवंत शिवराम खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा वृक्ष अधिकारी,
संभाजी उद्यान, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.बा.वि.जगताप

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.५.२००७, २१.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००७, १३.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.विश्वास य.गोडबोले, स.नं.३७९, शनिवार पेठ, पुणे-३० यांचे मालकीचे जागेवरील दोन झाडांबाबतची माहिती. श्री.गोडबोले यांना श्री.लिमये यांच्या दि.१९.५.२००७ च्या अर्जासंबंधी माहिती अधिकारात दिलेली सर्व माहिती. श्री.गोडबोले यांनी वरील जागेतील दोन झाडांची छाटणी करण्याबाबत दि.१९.५.१९९८ नंतर परवानगी मागितलेली असल्यास अथवा दिली असल्यास त्यावरील कारवाईसह एक प्रत. | |

## विवेचन

आपल्या शेजाऱ्याने केलेल्या दोन झाडाच्या छाटणीबाबतची माहिती विलंबाने मिळाल्याबद्दल अपीलकर्ता श्री.मधुसूदन प. लिमये यांनी केलेल्या प्रथम अपिलात विलंबाबाबतच्या चौकशीचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.लिमये यांनी त्याच विषयात दुसरे अपील केले. त्यातील अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक, पुणे महानगरपालिका यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री.लिमये यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्री.लिमये (पत्ता-३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३०) यांनी श्री.विश्वास यशवंत गोडबोले (पत्ता-३७९, शनिवार पेठ, पुणे-३०) यांच्या मालकीच्या जागेमधील दोन झाडांच्या छाटणीबाबत परवानगी मागितल्याची व अन्य व्यक्तींनी केलेल्या तक्रारीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त(जनरल), पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. त्यांनी हा अर्ज दि.१४.६.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे पाठविला. ज्या तक्रार अर्जाबाबत माहिती मागितली आहे, तो दि.१९.५.१९९८ रोजीचा असून माहिती सन २००६ मध्ये मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा वृक्ष अधिकारी यांनी याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, जनरल, पुणे

महानगरपालिका यांच्याकडे आठ दिवसात पाठविली. परंतु त्यांच्याकडून ही माहिती श्री.लिमये यांना दि.७.८.२००७ रोजी देण्यात आली. आपल्याला विहित मुदतीपेक्षा एक महिना उशिरा माहिती मिळाल्यामुळे चौकशी करुन विलंबाला जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.लिमये यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक, पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली. विलंबाबाबत तपासणी करुन विलंबाची जबाबदारी निश्चित करुन जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, (जनरल) यांनी १५ दिवसात अहवाल सादर करावा असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक, पुणे महानगरपालिका श्री.यशवंत शिवराम खैरे यांनी दिला. हा आदेश अर्धवट असल्याच्या कारणावरुन श्री.लिमये यांनी वेगळे अपील केले. दरम्यानच्या काळात सौ.लता पो.चौधरी (बारनिशी लेखनिक ) यांनी नजरचुकीने आपल्याकडून विलंब झाल्याचा खुलासा केला. माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक, पुणे महानगरपालिका श्री.यशवंत खैरे यांनी दिला. त्याविरुध्द श्री.लिमये यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

पूर्णतः खाजगी स्वरुपाच्या वादातील हा विषय आहे. या विषयात सार्वजनिक हित कोणते या विचारणेवर हा आपला व्यक्तिगत वादाचा विषय असल्याचे श्री.लिमये यांनी नमूद केले. विषयाचे एकूण स्वरुप पाहता अ) माहिती दिली आहे ब) विलंबाबाबत हेतुपुरस्सर टाळाटाळ दिसत नाही क) व्यक्तिगत वादापोटी माहितीच्या अधिकाराचा वापर करण्याचा अपीलकर्त्याचा प्रयत्न आहे, तो योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले फेटाळण्यात येत आहेत.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत शंकर खाडिलकर
१३०४/१/८, शुक्रवार पेठ, घाणेकर बिल्डिंग,
बाजीराव रोड, टेलीफोनभवनजवळ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४८ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.विलास कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.दयानंद सोनकांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८(द्वितीय अ.नंतर) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>महापालिका मिळकतींवर जो कर बसवते तो कर प्रत्यक्ष आहे की अप्रत्यक्ष. भाडेकरुने कर भरण्याच्या काय तरतुदी आहेत? घराचे कोणते कर घरमालकाने व कोणते भाडेकरुने भरावयाचे याची माहिती व त्यासंबंधातील तरतुदी. |

## विवेचन

विविध करांबाबत कोणते कर घरमालकाने भरावेत व कोणते कर भाडेकरुने भरावेत याबाबतचा खुलासा महापालिकेकडून व्हावा म्हणून अपीलकर्ता श्री.वसंत शंकर खाडिलकर यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडून माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना शुल्क कळविले, परंतु माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.खाडिलकर यांनी राज्य माहिती आयुक्तांकडे अपील केले आहे.

श्री.खाडिलकर यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी नियमानुसार होणारे शुल्क कळविले होते, परंतु त्यांनी ते न भरल्यामुळे माहिती पाठविली नव्हती. श्री.खाडिलकर यांचे वय पंचाहत्तरीच्या पुढे आहे, हे लक्षात घेता संबंधित माहिती त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१४.८.२००८ रोजी माहिती पाठविल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी आयोगाला सादर केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश एकनाथ देशमुख
२४०, सोमवार पेठ, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.४,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
धनकवडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.४,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.राजेंद्र मुठे

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
धनकवडी कार्यालय, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ श्री.उमेश माळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अनधिकृत नळजोडासंदर्भातील ३४ मुद्दयांची माहिती. | |

## विवेचन

अनधिकृत नळजोडासंदर्भातील ३४ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.प्रकाश एकनाथ देशमुख यांनी जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, धनकवडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ यांच्याकडे मागितली होती. परंतु आपल्याला दिलेली माहिती त्रोटक, मोघम, दिशाभूल करणारी व खोटी असल्याचे नमूद करुन श्री.देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.देशमुख यांनी मागितलेल्या माहितीसाठी कळविलेले शुल्क भरल्यानंतर रजिस्टर्ड टपालाने त्यांना माहिती पाठविण्यात आली, परंतु त्यांनी ती माहिती स्वीकारली नाही, त्यामुळे सदर पाकिट परत आले. समक्ष येऊन माहिती स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी श्री.देशमुख स्वतः उपस्थित नव्हते तर त्यांचे प्रतिनिधी श्री.दीपक देशमुख हे उपस्थित होते. टपाल खात्याकडून परत आलेले सिलबंद पाकीट त्यांना दाखविण्यात आले व समोर पाकिट उघडून कागदपत्रांसह संपूर्ण माहिती त्यांना दि.७.१२.२००७ रोजी समक्ष देण्यात आली. दिलेली माहिती पूर्ण व बरोबर आहे असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, धनकवडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.उमेश माळी व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.राजेंद्र मुठे यांनी केले. अपीलकर्त्याची मूळ तक्रार ही एका नळजोडणीबाबतची असून त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती, असे प्रतिपादन श्री.माळी यांनी केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी पाठविलेली माहिती न स्वीकारण्याची तसेच पूर्ण व योग्य माहिती दिलेली असताना ती त्रोटक व खोटी असल्याचे म्हणून आयोगाकडे अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. अनधिकृत नळ जोडणीबाबत तक्रार अर्ज केला असल्यास त्यावरील कार्यवाहीची माहिती विचारणे योग्य ठरले असते. माहितीच्या अधिकाराचा अशा प्रकारे अयोग्य पध्दतीने वापर न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

हुसेन महंमद शेख
मशिदीसमोर,मु.पो.ता.आटपाडी,
जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हाधिकारी , सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
अप्पर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६ / सांगली |

**२. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हुसेन महंमद शेख
मशिदीसमोर,मु.पो.ता.आटपाडी,
जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हाधिकारी , सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा
अप्पर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.३.२००५ |
| ४ | जन मोहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -१३.४.२००५ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.६.२००५ |
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.४.२००६ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | शासन परिपत्रक क्र.आ.ए.एम.१०९०/२१०४/ल-६, दि.२७.१२.१९९० चे जमीन नोंदी संदर्भातील परिपत्रकाची छायाप्रत. |

वाचाः राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांचा दि.२२.०९.२००८ चा आदेश.

## विवेचन

आयोगाच्या आदेशात पुढील प्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे:-

१. राज्य माहिती आयोगाच्या दि. २२/९/२००८ रोजी दिलेल्या निदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस श्री.एस.के.जाधव यांना शास्ती लादण्यात आलेली होती. परंतु या अपिलामध्ये श्री.एस.के.मोरे हे तत्कालीन जन माहिती अधिकारी असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सांगली यांनी दि. ३०/९/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

२. तसेच, राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठासमोर दि.१४.५.२००८ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा.आयुक्त यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस यांच्याकडून प्राप्त झालेल्या खुलाशा संदर्भात अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १९.०९.२००८ रोजी अहवाल मा.आयुक्त यांना सादर केल्याचे त्यांच्या दि.३०.०९.२००८ च्या पत्रात नमूद केले आहे. सदरहू पत्रात नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन दंडात्मक कार्यवाहीचा आदेश हा श्री. एस.के.जाधव यांचे नावे झाल्याने त्याचे पुर्नविलोकन होऊन तो रद्द करण्याची मागणी केली आहे.

## आदेश

१. आयोगाच्या दि.२२.९.२००८ च्या आदेशामध्ये जेथे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या नावाचा उल्लेख 'श्री.एस.के.जाधव' करण्यात आला आहे त्याऐवजी 'श्री.एस.के.मोरे' असे वाचावे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी यांनी केलेली सदर अपिलातील दंडात्मक कारवाईचा दि. २२.९.२००८ चा आदेश रद्द करण्याची विनंती अमान्य करण्यात येत आहे. तसेच दि. २२.९.२००८ च्या आदेशामधील पृ.४ वरील (२) सहावी ओळ 'ऑक्टोबर महिन्यात मिळण्याऱ्या सप्टेंबर महिन्याच्या पगारातून वसूल करुन 'ऐवजी जूलै २००९ महिन्यात मिळणाऱ्या जून २००९ महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती असे वाचावे. तसेच श्री.एस.के.मोरे यांचे सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगास सादर करण्याची जबाबदारीही अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांची राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बालाजी महिपती जाधवर
हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्ती, कोथरुड, पुणे-४११०३८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त(नि.वि.यो.),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता (ग.व.नि.),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२५ / पुणे / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बालाजी महिपती जाधवर
हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्ती, कोथरुड, पुणे-४११०३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त(नि.वि.यो.),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.प्रविण आष्टिकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.८.२००२ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.१०.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | झोपडपट्टी पुनर्वसनाविषयी पुणे महानगरपालिका हद्दीसाठी असणाऱ्या नियमावलीची प्रत, हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्ती, स.क्र.१६७/१६८ व १५९/१६० येथील पुनर्वसनाविषयी बांधकाम व्यवस्थापकाने प्रस्ताव दिला आहे काय, असल्यास प्रत, तसेच मूळ मालक कोण व मूळ विकास आराखड्यात कोणत्या कारणासाठी आरक्षण आहे, झोपडपट्टी घोषित आहे काय, क्षेत्रफळ किती आहे, तसेच व्यावसायिक, निवासी याची नावासहीत यादी मिळावी. |

## विवेचन

पुण्यातील हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्तीमधील झोपडपट्टी पुनर्वसनाबाबतची माहिती चकीची व अपुरी मिळाली, तसेच संबंधित विभागाकडे माहितीसाठी अर्ज करावा, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला, म्हणून अपीलकर्ता श्री.बालाजी महिपती जाधवर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन नियमावली आदी चार मुद्दयांची माहिती आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी मूळ मुद्दयांशी संबंधित नसलेली माहिती दिली व अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त(नि.वि.यो.), पुणे महानगरपालिका यांनी, 'झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व विकास योजना पुणे महानगरपालिका यांच्याकडील माहिती त्यांच्याकडून अर्ज करुन घ्यावी व झोपडपट्टी घोषित करताना जागेवर सर्व्हे केलेली यादी व संबंधित माहिती घोषित विभागामार्फत द्यावी,' असा निर्णय दिला. आपण जागेवर सर्व्हे केलेली यादी मागितली नसून पात्र झोपडपट्टी धारकांची यादी मागितली होती. ती दडवून ठेवण्यात आली. जी झोपडपट्टी घोषित नसल्याचे सांगितले होते, त्याची चुकीची यादी पाठविली, असे प्रतिपादन श्री.जाधवर यांनी केले. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती त्यावेळच्या वस्तुस्थितीनुसार योग्य आहे. पात्र व अपात्र झोपडपट्टीधारकांच्या यादीबाबत त्यावेळी फेर-तपासणीचे काम सुरु होते. ते पूर्ण झाल्यावर यादी दिली जाईल असे कळविले होते., असे अपिलीय प्राधिकारी श्री.प्रविण आष्टिकर यांनी पूरक

कागदपत्रांसह नमूद केले. संबंधित अर्ज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विलंबाने वर्ग करण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री.जाधवर यांनी मागितलेली माहिती विविध विभागांशी संबंधित आहे. अशा प्रकारे अधिक विभागांशी संबंधित माहितीची मागणी असेल , तेव्हा त्या त्या विभागाकडे अर्ज करुन त्या त्या विभागाची माहिती घेणे आवश्यक असल्याची समज आयोगाने श्री.जाधवर यांना दिली. मात्र मूळ अर्जाच्या हाताळणीत झालेला विलंब लक्षात घेता सर्व विभागांकडील माहिती प्राप्त करुन घेऊन आठ दिवसात व महानगरपालिकेकडील माहिती तीन दिवसात श्री.जाधवर यांना देण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार महानगरपालिकेकडील माहिती दि.१८.८.२००८ रोजी व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, सेनापती बापट रोड, पुणे यांच्याकडील माहिती दि.२१.८.२००८ रोजी दिल्याचा अहवाल अनुक्रमे विशेष कार्याधिकारी (ग.व.नि.), पुणे महानगरपालिका श्री.प्रविण आष्टिकर व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे श्री.दिलीप गावडे यांनी आयोगाला सादर केला आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१३.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.०४.०४.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८२४ /पुणे | श्री.विलास प्रभाकर रुद ५८७, बुधवार पेठ, पुणे २ | गाव कामगार तलाठी, साईव बु., ता.वेल्हा, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार. तहसील कार्यालय,वेल्हा, ता.वेल्हा, जि.पुणे | मौजे साईव बु., ता.वेल्हा येथील गट नं.९५,९७ व १०१ या सदरातील सातबाराच्या चालू सत्यप्रती |
| २ | १९३८ /पुणे | श्री.प्रधुमन प्रतापसिंग अशर 'चेत्रबन'रेसिडन्सी, ऑफ आय टी आय रोड, औंध, पुणे-७ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय मुळशी, पौड, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय मुळशी, पौड, जि.पुणे | मौजे वाकड, ता.मुळशी येथे स.नं.७५/१ च्या ७/१२ वर माझे नावाची नोंद करताना क्षेत्राबाबत झालेली चूक दुरुस्त करण्यासाठी दि.१४.०२.२००८ रोजी केलेल्या अर्जावर घेण्यात आलेल्या निर्णयाची सत्यप्रत |
| ३ | १८५९ /पुणे | श्री.कौस्तुभ चंद्रशेखर गोसावी बिल्डिंग नं.६४, युनायटेड वेस्टर्न सोसायटी, कर्वेनगर, पुणे-५२ | गाव कामगार तलाठी, मारुंजी, ता.मुळशी, जि.पुणे | मंडळ अधिकारी, मारुंजी, ता.मुळशी, जि.पुणे | मौजे मारुंजी, ता.मुळशी येथील स.नं.३८/१/९ या जमिनीचे खरेदी दस्त नं.जुना २९२/१९८९ व नवीन नं.११३/९० या दस्ताचे अ पत्रकावर घेण्यात आलेल्या निर्णयाची सत्यप्रत |
| ४ | १५७६ -अ /पुणे | श्री.प्रशांत गोपाळ चंद्रचूड ५८७ बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार. तहसील कार्यालय शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे | तहसीलदार. तहसील कार्यालय शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे | ग्राम जोशी म्हणून असलेली इनाम जमिनीचे कब्जे हक्कांची रक्कम व दंड भरुन पुन्हा मला मिळण्यासाठी जिल्हाधिकारीं,पुणे यांच्याकडे दि.२१.१०.२००० रोजी केलेला अर्ज तहसीलदार, शिरुर यांच्याकडे चौकशीसाठी पाठविला आहे.याअर्जावर घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १६८६ /पुणे | श्री.श्रीकांत बाबुराव टेमकर ५८७, बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | गाव कामगार तलाठी, अवसरी खु.,ता.आंबेगाव, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | मौजे अवसरी खु.,ता.आंबेगाव येथील स.नं.१४/९, १५/१०, १५/१४, १५/२०, १५/२२, १५/३४,१५/४, १५/५ व इतर जमिनीवर वारस नोंद करण्यासाठी दि.२०.११.२००७ रोजीच्या अर्जावर कार्यवाहीची मागणी व निर्णयाची प्रत |
| ६ | १६८७ /पुणे | श्री.श्रीकांत बाबुराव टेमकर ५८७, बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | मौजे अवसरी खु.,ता.आंबेगाव येथील स.नं.१४/९, १५/१०, १५/१४ या जमिनीवर वारसानोंद घेण्यासाठी दि.२०.०७.२००७ रोजी तलाठ्याकडे अर्ज दिलेला होता, यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती |
| ७ | २००५ /पुणे | सौ.पार्वतीबाई गुलाबराव गायकवाड श्री.सुरेश गुलाबराव गायकवाड बी-१३,सुखवाणी रेसिडेन्सी, गणेशनगर, दापोडी, पुणे-१२ | तहसीलदार, तहसील कार्यालय, राजगुरुनगर , ता.राजगुरुनगर, जि.पुणे | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजगुरुनगर, पुणे | मौजे पिंपळगाव, ता.राजगुरुनगर येथील स.नं.१६०४/१, १६०४/०२ व १६०७/०३ जुने शर्तीने जमिनीची विक्री करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत दि.०३.०९.२००३ रोजी तहसीलदार, राजगुरुनगर यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेला होता. त्यावर झालेल्या निर्णयाची सत्यप्रत |
| ८ | २००६ /पुणे | सौ.पार्वतीबाई गुलाबराव गायकवाड श्री.सुरेश गुलाबराव गायकवाड बी-१३,सुखवाणी रेसिडेन्सी, गणेशनगर, दापोडी, पुणे-१२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राजगुरुनगर , ता.राजगुरुनगर, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय राजगुरुनगर , ता.राजगुरुनगर, जि.पुणे | मौजे पिंपळगाव, ता.राजगुरुनगर येथील स.नं.१६०४/१, १६०४/०२ व १६०७/०१ या जमिनीची जुने शर्तीने विक्री करण्यास परवानगी मिळणेबाबत दि.०३.०९.२००३ रोजी अर्ज केला होता. या अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या निर्णयाची सत्य प्रत. |
| ९ | २०१६/ पुणे | श्री.सहदेव त्र्यंबक पत्ती ५०, लाईन बाजार, पूर्व विभाग, सॅपर्स, खडकी, पुणे-३ | अभिलेख कक्ष प्रमुख, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.वडगाव मावळ, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.वडगाव मावळ, जि.पुणे | मौजे नवलाख उंबरे, ता.मावळ येथील स.नं.२१२/३, २१३/१ व २१३/३ या जमिनीचे ७/१२ उतारे व त्यावरील सर्व फेरफार उताऱ्यांच्या सत्य प्रती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | १७७०/पुणे | सौ.सरोज जगदीश लाटे<br>श्री.जगदीश नानुराम लाटे<br>५८७,बुधवार पेठ, पुणे-५ | गाव कामगार तलाठी, कासार आंबोली,<br>ता.मुळशी, जि.पुणे | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुळशी, जि.पुणे | मौजे कासार आंबोली, ता.मुळशी येथील स.नं.१९७ पैकी ०.२३ आर ही खरेदी केलल्या जमिनीवर माझे नाव लावण्यासाठी<br>दि.२४.०१.२००७ रोजी अर्ज केला होता त्यानुसार फेरफार १७४१ करण्याबाबत नोटीस प्राप्त झाली. या फेरफाराचा अंमल ७/१२ झाला किंवा नाही याबाबत माहिती |
| ११ | १७७१/पुणे | सौ.सरोज जगदीश लाटे<br>श्री.जगदीश नानुराम लाटे<br>५८७,बुधवार पेठ, पुणे-५ | गाव कामगार तलाठी, कासार आंबोली,<br>ता.मुळशी, जि.पुणे | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुळशी, जि.पुणे | मौजे कासार आंबोली, ता.मुळशी येथील फेरफार नं.१७४१ ची सत्यप्रत |
| १२ | २०३७/पुणे | श्री.दिपक मारुती शेलार<br>गल्ली नं.९, ससाणेनगर, हडपसर, डॉ.गवळी यांचे मागे, हडपसर, पुणे | गाव कामगार तलाठी, गोऱ्हे खु., ता.हवेली, जि.पुणे | मंडल अधिकारी, गोऱ्हे खु., ता.हवेली, जि.पुणे | मौजे गोऱ्हे खु.,ता.हवेली येथील स.नं.२५३ चा ७/१२ उतारा आपल्या दप्तरी असल्यापासून ते सन २००८ पर्यंतच्या व त्यावरील सर्व फेरफार उतारे |
| १३ | २०३८/पुणे | श्री.दिपक मारुती शेलार<br>गल्ली नं.९, ससाणेनगर, हडपसर, डॉ.गवळी यांचे मागे, हडपसर, पुणे | अभिलेख कक्ष प्रमुख, तहसीलदार कार्यालय, हवेली, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार. तहसीलदार कार्यालय, हवेली, जि.पुणे | मौजे गोऱ्हे खु., ता.हवेली येथील सन २५३ चे १९३० पासून दप्तरी असलेले ७/१२ उतारे व त्या वरील फेरफार उतारे |
| १४ | १५५०/पुणे | श्री.भगवान निंबाळकर<br>५८७, बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | मौजे फुरसुंगी, ता.हवेली येथील गट नं.२२३/३/६, २२३/४ व २२३/५/२ चे सन १९५६-५७ ते जानेवारी २००७ अखेर ७/१२ उतारे, फेरफार उतारे यांच्या सत्य प्रती |
| १५ | १३०६/पुणे | श्री.सतीश शांतीलाल चोपडा<br>६/६,सुपार्श्वनाथ हौ.सोसायटी, मार्केटयार्ड रोड, | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | मौजे पाषाण, ता.हवेली येथील स.नं.११० वरील फेरफार नं.१७७०, १७६५,१७६८,१७६९,१७७१,१७७२,१७७४ व १७७५ च्या फेरफार उताऱ्यांच्या सत्य प्रती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुणे ३७ | | | |
| १६ | १३११/ पुणे | श्री.सतीश शांतीलाल चोपडा ६/६.सुपार्श्वनाथ हौ.सोसायटी, मार्केटयार्ड रोड, पुणे ३७ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | मौजे पाषाण, ता.हवेली येथील स.नं.२,३,४,५,,६,,७,८,९,१०,११, १२,१३,,१४,१५,१६ सदरचे सन १९७१-१९७२ या कालावधीतील सत्य प्रती |
| १७ | १३१३/ पुणे | श्रीमती हेमलता वाणी ३०५, जुनवणे रेसिडेन्सी, गुरुद्वारा समोर, औंधगाव, पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | मौजे बाणेर, ता.हवेली येथील स.नं.२३३/१/३ पैकी सदरचे ७/१२ उतारे सन १९७७ पासून ते दप्तरी असे पर्यंत सर्व फेरफारच्या सत्य प्रती |
| १८ | १६२८ /पुणे | श्री.रामचंद्र पांडुरंग पेंडसे द्वारा-श्री.डी. बी. शिंदे, ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, जि.पुणे | मौजे रहाटणी, ता.हवेली येथील स.नं.३३ पैकी दस्त क्र.२२१३/८८ चे 'अ'पत्रकाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाही माहिती व अपिलाच्या निकालाची प्रत |
| १९ | १९३९/ पुणे | श्री.भूषण चंद्रकांत ताईतवाले शिवनेरी गणपती मंदिरामागे, शास्त्री चौक, भोसरी, पुणे-३९ | गाव कामगार तलाठी, भोसरी, ता.हवेली, जि.पुणे | मंडल अधिकारी, भोसरी,ता.हवेली, जि.पुणे | मौजे भोसरी, ता.हवेली येथील स.नं.२०२/३अ पैकी २ आर जमिनीचे 'अ'पत्रक दस्त नं.११४००/८६ दि.२९.०९.१९८६ प्राप्त झाल्यानंतर करण्यात आलेल्या कारवाईची सत्य प्रत |
| २० | १९२८ /पुणे | सौ.साधना राजाराम दांडेकर घ.नं.१०,गजानन महाजननगर, नवी सांगवी, गुरव पिंपळे, पुणे २७ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे | मौजे मोशी, ता.हवेली येथील स.नं.(नवीन) ४४२ मधील क्षेत्र ३७८० चौ.फूट या जमिनीसंबंधातील दस्त क्र.४३३६/९८ दि.१४.१०.१९९८ बाबतचे अपत्रकाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईची सत्यप्रत |
| २१ | १७५१ /पुणे | श्री.व्ही.जी.राव ५८७,बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | तलाठी, वडगावशेरी, ता.हवेली, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे | मौजे वडगावशेरी, ता.हवेली येथील स.नं.५०/११/१/१ चा ७/१२ उतारा व त्यावरील फेरफार नंबर १४६५३ व १४६५४ ची सत्यप्रत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | १६३९/ पुणे | श्री.विजु काशिराम रजपूत ५८७,बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | गाव कामगार तलाठी, घोरपडी, पुणे शहर, पुणे | निवासी नायब तहसीलदार. तहसील कार्यालय, पुणे शहर, पुणे | मौजे घोरपडी येथील स.नं.७१/७ क + २१/१ अ पैकी क्षेत्र ००.०१/२ आर जमिनीबाबत दि.०१.११.१९९३ रोजी खरेदी दस्त क्र.४८७४/१९९३ केली. सदर खरेदी दस्तांचे अ पत्रकानुसार करण्यात आलेल्या कारवाईची सत्यप्रत |
| २३ | १९१४ /पुणे | श्री.रजनीकांत चंद्रकुमार जेठा कृष्णकुंज, १०, कोरेगाव पार्क, पुणे-१ | पुणे शहर तलाठी, शुक्रवार पेठ, पुणे | निवासी नायब तहसीलदार. तहसील कार्यालय, पुणे शहर, पुणे | मौजे पुणे शहर स.नं.४७९+४८० क +४८१ब क्षेत्र हेक्टर ००.९९ आर या जमिनीच्या वारस नोंद घेण्यासाठी दि.०२.१२.२००६ रोजी अर्ज केला होता. या अर्जानुसार फेरफार नोंदी घेण्यात आलेल्या निणयाची सत्य प्रत |
| २४ | १९९१/ पुणे | श्री.रजनीकांत चंद्रकुमार जेठा कृष्णकुंज, १०, कोरेगाव पार्क, पुणे-१ | पुणे शहर तलाठी, शुक्रवार पेठ, पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर, पुणे | मौजे पुणे शहर स.नं.४७९+४८०+४८१+ व २ या जमिनीवर वारस नोंद २३०४०९ ने झाली. सदर फेरफारावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. |

या सर्व अपिलांमध्ये अपीलकर्त्यांनी पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्यांच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षऱ्यांमध्ये तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकांमुळे त्यांच्या अधिकृतता शंकास्पद आहे. तसेच कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. तसेच नकलांसाठी स्वतंत्र नियमावली आहे. अशा संदर्भातील प्रतींसाठी त्या नियमावलीनुसार आवश्यक ती प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' च्या व्याख्येशी सुसंगत नाही. या बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील सर्व अपिले अनुक्रमांक १ ते २४ (क्रमांक १८२४, १९३८, १८५९, १५७६, १६८६, १६८७, २००५, २००६ २०१६, १७७०, १७७१, २०३७, २०३८, १५५०, १३०६, १३११, १३१३, १६२८, १९३९, १९२८, १७५१, १६३९, १९१४ व १९९१) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८ -०५ -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाजीराव विश्वनाथ कांबळे व इतर
स.नं.६५, तळजाई वसाहत, मारुती मंदिरामागे,
पद्मावती, सहकारनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त(नावियो),
नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प अधिकारी,
नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६१ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाजीराव विश्वनाथ कांबळे व इतर
स.नं.६५, तळजाई वसाहत, मारुती मंदिरामागे,
पद्मावती, सहकारनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त(नावियो),
नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.अशोक विष्णू कळमकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>महापालिका आयुक्त कार्यालयाकडून मान्यता देण्यात आलेल्या सेवाकेंद्रांची स्थापन केल्यापासून आजअखेरची माहिती. | |

## विवेचन

सेवाकेंद्राबाबत आपण व इतर पाच जणांनी मागितलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.बाजीराव विश्वनाथ कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. श्री.कांबळे यांच्यासह सहा सेवकांना कामावरुन कमी करण्यात आले. म्हणून सेवा केंद्रामधील कारभाराबद्दल तक्रारी नोंदवून त्यांनी स्मार्ट सहकार सेवा संस्थेच्या अनुषंगाने माहिती मागणारा अर्ज अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालयाकडे केला. त्यांनी तो जन माहिती अधिकारी, नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका यांच्याकडे वर्ग केला. माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.कांबळे आदींनी महापालिका आयुक्त कार्यालयाकडे अपील दाखल केले. महापालिका आयुक्त कार्यालयाने हे अपीलही अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका यांच्याकडे वर्ग केले. माहिती मिळविण्यापेक्षा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यावर भर देणे व नागरिकांच्या समूहाला माहिती देण्याची तरतूद अधिनियमात नसणे ही कारणे नमूद करुन, तसेच 'वैयक्तिकरित्या मुद्देसूद माहिती मागितल्यास देता येईल,' असे नोंदवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले.

आपली कारवाईची मागणी नाही, परंतु माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.कांबळे व श्री.रणजीत चंद्रकांत होनराव यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. मात्र आपल्याला अन्यायाने काढून टाकण्यात आले व सेवा केंद्राच्या कारभारात भ्रष्टाचार आहे , अशा स्वरुपाचे मुद्दे त्यांनी लेखी निवेदनात व सुनावणीत मांडले. नेमक्या माहितीची मागणी करणारा अर्ज श्री.कांबळे यांनी

द्यावा व ती माहिती तीन दिवसात अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त, नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका श्री.अशोक विष्णू कळमकर यांनी द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार श्री.कांबळे यांनी दि.१४.८.२००८ रोजी केलेलया अर्जानुसार त्यांना माहिती दिल्याची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त (नाविया) नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र कस्तुरचंद सुराणा
डी-१, मनाली आर्केड, पुणे सातारा रोड,
स्व.क.रा.सुराणा चौक, पद्मावती पुलाजवळ, पुणे-९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त,
भूसंपादन व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भूमी आणि जिंदगी विभाग, पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०९ / पुणे / २००[illegible] |
| २ | सुनावणी [illegible] | दि. १३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र कस्तुरचंद सुराणा
डी-१, मनाली आर्केड, पुणे सातारा [illegible], स[illegible] क.रा.सुराणा चौक,
पद्मावती पुलाजवळ, पुणे-९

**अपिलीय प्राधिकारी** तथा [illegible],
भूसंपादन व व्यवस्थापन, पु[illegible] महानगरपालिका प्रतिनिधी श्री.रमेश शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>२५९/२ नाना पेठ, पुणे येथे जैन धर्मस्थानक आहे. धर्मस्थानकाच्या दरवाजात व परिसरात भाजी मंडई भरते. ही मंडई हलविण्याकरिता काय प्रयत्न झाले, पत्रव्यवहार झाले, महापालिकेतर्फे काय आदेश देण्यात आले, त्याच्या प्रती. नाना पेठ डोके तालीम व परिसर हॉकर्स झोन म्हणून जाहीर झाला यामध्ये हा झोन कधी जाहीर झाला, यामध्ये कोणता परिसर येतो, यामध्ये २५९ नाना पेठचा समावेश आहे का? झोन जाहीर करण्यासंदर्भातील ठराव व सर्व पत्रव्यवहाराच्या नकला. | |

## विवेचन

नाना पेठ, पुणे येथील जैन धर्मस्थानकाच्या दरवाजात व परिसरात भरणारी भाजी मंडई हलविण्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.राजेंद्र कस्तुरचंद सुराणा यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे दोन स्वतंत्र अर्जांद्वारे अनुक्रमे दि.१४.११.२००७ व १९.१२.२००७ रोजी मागितली होती. दि.३१.१०.२००७ व दि.२६.११.२००७ रोजी श्री.सुराणा यांना संबंधित माहिती देण्यात आली, परंतु आपल्याला हवी असलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.सुराणा यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.सुराणा यांनी मागितलेली माहिती पूर्ण देण्यात आली असल्याचे विशेष कार्य अधिकारी, अतिक्रमण विभाग, पुणे श्री.रमेश शेलार यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. संबंधित भाजी

मंडईमुळे धर्मस्थानकाचा वापर करणे कठीण झाले असून मंडई अन्यत्र हलविणे आवश्यक आहे व त्या अनुषंगाने आपण मागणी केली आहे, असे श्री.सुराणा यांनी सांगितले. मात्र हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१३.५.२००९